महाराष्ट्र टाइम्स मरिन ड्राइव्ह point

शनिवार, ५ फेब्रुवारी २०११



# मुंबईचं रक्षणकर्ती मुंबादेवी

डॉ. तुषार यशवंत सावडावकर

काळबादेवी आणि झवेरी बाजार या मोठ्या बाजारपेठेमध्ये वसलेलं श्री मुंबादेवी मंदिर! जवळजवळ दीडशे वर्षांचा इतिहास असलेलं हे मंदिर आहे. १५० वर्षांपूर्वी आत्ताच्या छत्रपती शिवाजी टर्मिनसमधल्या एका प्लॅटफॉर्मवर काही कोळी बांधवांनी मुंबादेवीची स्थापना केली. या देवीचं दर्शन घेतल्याशिवाय ते कामाची सुरुवात करत नसत.

ब्रिटिशांचं राज्य आल्यावर बोरीबंदर इथे रेल्वेलाइन आणि प्लॅटफॉर्म उभारायचं ठरलं. म्हणून या मंदिराचं स्थलांतर धोबीतलाव इथे करण्यात आलं. नंतर आज जिथे मंदिर आहे ती जागा ब्रिटिशांनी कोळी समाजाला देऊ केली आणि तिथे पूर्ण दगडांमध्ये या मंदिर बांधण्यात आलं. या मंदिराला आज हेरिटेज दर्जा प्राप्त झाला असून मुंबादेवीच्या नावाने या शहराला 'मुंबई' हे नाव प्राप्त झाल्याचं सगळ्यांना माहीत आहेच.

या मंदिराचं वैशिष्ट्य म्हणजे ते पूर्णपणे दगडामध्ये कोरलेलं आहे. याचे खांबही दगडी आहेत आणि मंदिराच्या आतल्या भागात सुंदर कोरीव नक्षीकाम आहे. मंदिराच्या गाभाऱ्यात दोन मुख्य मूर्ती असून त्यातली डाव्या बाजूची मूर्ती मुंबादेवीची असून त्यामागे गायत्री देवीची प्रतिमा आहे. गाभाऱ्याच्या दरवाजावर गणपतीची मूर्ती असून आजूबाजूला रिद्धी आणि सिद्धी आहेत. गाभाऱ्यातही सुंदर नक्षीकाम केलं असून मंदिराचा घुमट गोलाकार दगडी आहे. गाभाऱ्याच्या दरवाज्यावर वेगवेगळ्या देवतांची सुबक चित्रं आहेत. त्यात

## देवळांच्या गावा...

मगरवाहिनी, कूटवाहिनी, सरस्वती, चंडिका, लक्ष्मी, दुर्गा अशा देवींची सुबक चित्रं चांदीमध्ये कोरलेली आहेत. मुंबादेवीची मूर्ती पुरातन असून ती मातीची आहे आणि ती वास्तूशास्त्राच्या नियमानुसार पूर्वाभिमुख आहे. मूर्तीच्या समोर आरसा आहे.

मंदिराच्या उजव्या हाताला जगदंबेची संगमरवरीची पाच फुटाची उभी मूर्ती आहे. मूर्तीच्या डाव्या बाजूला अन्नपूर्णा देवीची मूर्ती असून उजव्या हाताला माताजी स्वरूप यंत्राची स्थापना केली आहे. तसंच गाभाऱ्याच्या दरवाज्यासमोर दोन चांदीत मढवलेले द्वारपाल आहेत. जगदंबेच्या मूर्तीचं दर्शन सर्वांना घडावं यासाठी मूर्तीच्या पूर्वेला आरसा लावला आहे.

मुंबादेवीचं प्रवेशद्वार दक्षिणेला असून प्रथम गणपतीचं मंदिर आहे. त्यानंतर अनुक्रमे मारुती, शंकर आणि इंद्राणीमातेचं मंदिर आहे. या मंदिराचा कारभार मुंबादेवी मंदिर चॅरिटीज ट्रस्टद्वारे चालतो. या ट्रस्टची स्थापना १९५३ मध्ये झाली. देवळाचा कारभार नऊ ट्रस्टी बघतात आणि मंदिरात जमा होणारा निधी वैद्यकीय किंवा शैक्षणिक सेवा पुरवणाऱ्या संस्थांना दिला जातो.

मंदिराच्या वर्धापनदिनाला 'पाटोत्सव' म्हटलं जातं. तो माघ महिन्याच्या एकादशीला होतो. यावर्षी 'पाटोत्सव' १४ फेब्रुवारी रोजी होणार आहे. चैत्र नवरात्र आणि आश्विन नवरात्र हे दोन्ही उत्सव इथे मोठ्या प्रमाणात साजरे होतात. कार्तिक प्रतिपदेला इथे अन्नकोट महोत्सव साजरा केला जातो. त्यावेळी ५६ वेगवेगळ्या प्रकारची पक्वान्नं मंदिरातल्या ब्राह्मणांकरवी बनवली जातात आणि त्याचा मुंबादेवीला नैवेद्य दाखवला जातो. त्याला गुजरातीमध्ये 'छप्पन भोग' असं म्हटलं जातं.

इथे दर्शनासाठी रोज दहा ते पंधरा हजार भाविक येतात. यात हिंदी भाविकांचं प्रमाण जास्त आहे. नवरात्रात २५ ते ३० हजार भाविक देवीचं दर्शन घेण्यासाठी येतात. नवरात्रातल्या सप्तमी, अष्टमी, नवमीच्या दिवसांत हा आकडा ७० ते ७५ हजारपर्यंत जातो. हिंदूंप्रमाणे इथे मुस्लीम बांधवही देवीच्या दर्शनासाठी येतात. नवस पूर्ण झाल्यावर मुंबादेवीला चांदीचे डोळे अर्पण करण्याची प्रथा आहे. नवसाला पावणारी देवी म्हणून ही देवी प्रख्यात आहे.

मुंबादेवीची मूर्ती मातीची असून जगदंबा आणि अन्नपूर्णा देवीच्या मूर्ती संगमरवरी आहेत. या तिन्ही मूर्तींवर पहाटे अभिषेक होतो. सकाळी साडेसहा वाजता मंदिर उघडतं तेव्हा मंगलारती होते. सकाळी ७ वाजता मंदिर पुन्हा बंद होतं. या काळात तिन्ही देवींवर अभिषेक आणि त्यांचा साजश्रृंगार होतो. मग मंदिर पुन्हा सकाळी ८ वाजता उघडतं. सकाळी साडेनऊ वाजता मुख्य आरती होते. दुपारी १२ वाजता नैवेद्य दाखवला जातो आणि सायंकाळी ६.३० वाजता आरती होते. त्यानंतर ८ वाजता मुख्य आरती होते आणि रात्री ९.३० वाजता शयन आरती होऊन रात्री १० वाजता मंदिर बंद होतं.

या मंदिरामध्ये आल्यानंतर एक प्रकारचं चैतन्य अनुभवायला मिळतं. देवीच्या नुसत्या दर्शनाने शारीरिक आणि मानसिक थकवा दूर होतो अशी इथे येणाऱ्या प्रत्येक भाविकाची श्रद्धा आहे.

(लेखक वास्तूतज्ज्ञ आहेत)

mtartedit@gmail.com